जा.क्र. 1937/2017

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

13 APR 2017

**परिपत्रक क्र.** 499 **दिनांक** 13/04/2017

१) सेवा हमी कायदा १९१५ अंतर्गत संस्था नोंदणी अधिनियमाची प्रकरणे अधिसुचित केली जाणार असल्यामुळे सदरची प्रकरणे विहीत मुदतीत निकाली काढली जाणे आवश्यक आहे.

२) आजच्या तारखेस धर्मादाय संघटनेतील कार्यालयांमध्ये याबाबतची प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिसून येते. ही सर्व प्रकरणे अधिकाऱ्यांमध्ये विभागली गेलेली असून प्रत्येक अधिकाऱ्याकडे बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत.

३) नवीन दाखल झालेली प्रकरणे अधिक्षकांनी स्विकारल्यावर त्यातील दस्तऐवज, प्रतिज्ञालेख इत्यादी मुळ दस्तऐवजांशी तुलना करुन तपासून घ्यावीत आणि त्याचदिवशी नोंदणी शुल्क भरुन घ्यावे व प्रकरण संबंधित अधिकाऱ्यापुढे ठेवावे.

४) सर्व कार्यालयांतील संबंधित अधिक्षक यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी या सर्व फाईल्स संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपवाव्यात आणि संबंधित अधिकाऱ्यांनी ही प्रकरणे एका महिन्यात निकाली निघतील याकडे लक्ष द्यावे.

५) संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता झालेली असल्यास त्याच दिवशी किंवा शक्यतो १०-१५ दिवसांत पुढील आदेश करावेत.

प्रकरणांचा निपटारा करताना अधिकाऱ्यांनी pragmatic दृष्टीकोन ठेवावा.

(श.भा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. सर्व अधिक्षक
५. कार्यालयीन नोंदवही